# पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.

कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४

e-mail :sp.washim@mahapolice.gov.in  Website:www.washimpolice.gov.in


## प्रेस नोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

- 1 जुलै 1998 रोजी अकोला जिल्हयामधुन वाशिम जिल्हा वेगळा होउन वाशिम जिल्हा पोलीस घटक अस्तित्वात आले.
- वाशिम जिल्हयात एकुण 13 पोलीस स्टेशन आणि 03 पोलीस उपविभाग कार्यरत आहेत.
- दि. 24 नोव्हेंबर 2023 पासुन वाशिम पोलीस घटकाला लाभलेले मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांना गडचिरोली जिल्हयामध्ये नक्षलग्रस्त भागात प्रशंसनिय सेवेबद्दल राष्ट्रपती - शौर्य पदक मिळालेले आहे. त्यांनी वाशिम जिल्हयाचा पदभार स्विकारल्या नंतर पोलीसींग पध्दतीमध्ये विशेष बदल अंमलात आणुन गुन्हेगार व गुन्हयांवर लक्षणीय नियंत्रण मिळविले आहे.
- वाशिम जिल्हयातील उपलब्ध मनुष्यबळ :-

| पोलीस अधिक्षक | अपर पोलीस अधिक्षक | सहायक पोलीस अधिक्षक | पोलीस उपअधिक्षक | इतर पोलीस अधिकारी | अंमलदार |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | 01 | 02 | 90 | 1329 |

जिल्हयातील लोकसंख्येचा झालेला विस्तार व त्याअनुषंगाने निर्माण झालेल्या इतर परिस्थीतीचे तुलनेत जिल्हयामध्ये उपलब्ध पोलीस मनुष्यबळ संख्या कमी आहे.

### ❖ 2024 या वर्षात दाखल व उघड केलेले गंभीर गुन्हे.

| गुन्हयांचा प्रकार | दाखल गुन्हयांची संख्या | उघड गुन्हयांची संख्या |
|---|---|---|
| खुन | 29 | 29 |
| खुनाचा प्रयत्न | 31 | 31 |
| सदोष मनुष्यवध | 4 | 4 |
| बलात्कार | 57 | 57 |
| दरोडा | 4 | 3 |
| जबरी चोरी | 27 | 18 |

- एकंदर मा.पोलीस अधीक्षक वाशिम यांचे सर्वसमावेशक नियोजन व प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहीमुळे --
- मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण 40 % पर्यंत आहे हे प्रमाण मागील तुलनेत जास्त आहे.
- रात्र घरफोडी सारखे गंभीर संपत्तीविषयक गुन्हयात मागील तुलनेत - 16 ने घट झाली आहे.
- मोटार सायकल चोरीचे गुन्हयात मागील तुलनेत - 43 घट झाली आहे.
- ईतर चोरीचे गुन्हयात मागील तुलनेत - 66 ने घट झाली आहे.

## ❖ प्रतिबंधक कार्यवाही

- मा.पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे यांनी वाशिम जिल्हा पोलीस अधिक्षक पदाचा पदभार स्विकारल्यानंतर जिल्हयातील पोलीस दलाच्या कार्यपध्दतीमध्ये दर्जात्मक बदल घडवुन 24*7 प्रभावी पेट्रोलींग, जनसामान्यात पोलीसांची उपस्थिती, रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा सतत आढावा अशा सर्वसमावेशक कार्यपध्दतीमुळे चालु वर्षात कलम 126, 128, 129 भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम 93 ब महा. दारु. अधि. अंतर्गत एकुण 6880 अशा मोठया प्रमाणात प्रतिबंधक कार्यवाहया करुन जिल्हयातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या आहेत. जिल्हयात ठिकठिकाणी प्रभावी नाकाबंदी आणि कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यामुळे सन 2023 च्या तुलनेत सन 2024 मध्ये जिल्हयात चोरी, घरफोडींच्या, दुखपतींच्या घटनांमध्ये घट झालेली आहे.
- मा.जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे यांचे मार्गदर्शन व आदेशान्वये चालु वर्ष सन 2024 आजपावेतो एकुण 14 आरोपींवर MPDA कायद्या अंतर्गत कार्यवाहया करुन गुन्हेगारांना तुरुंगात स्थानबदध करण्यात आले आहे. ही आजपावेतो जिल्हयाच्या ईतिहासातील सर्वात मोठी प्रभावी कार्यवाही आहे. मागील सन 2021, 2022 व 2023 हे तिन्ही वर्ष मिळुन MPDA कायद्या अंतर्गत असणा-या कार्यवाहया पेक्षा अधिक फक्त एका वर्षात सन 2024 मध्ये MPDA कायद्या अंतर्गत कार्यवाहया करण्यात आल्या आहेत.
- मा. पोलीस अधिक्षक यांनी जनतेस आवाहन केले की, वाशिम जिल्हयात अशा प्रकारचे धोकादायक ईसम, हातभट्टी दारुवाले, गुंडगिरी करणारे, अवैध धंदे करणाऱ्या इसमाविरुध्द कठोर कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही कार्यवाही सत्र असेच सुरु राहणार असल्याचा संदेश मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी दिला आहे.

## ❖ अवैध धंदयांवर कारवाई

- **'जिल्हा अवैध दारुबंदी मोहीम'** राबविण्याचे दृष्टीने पोलीस स्टेशन स्तरावर प्रभावी सर्वोतोपरी प्रयत्न करुन अवैध दारु व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी सन 2024 आज पर्यंत महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत अवैध दारुच्या 2003 केसेस करण्यात आल्या असुन एकुण 3,23,44,524 रु चा मुददेमाल नष्ट करुन अवैध दारुच्या धंदयांवर प्रतिबंध करण्यासाठी फक्त अवैध हातभट्टी/गावठी दारुचा धंदा करण्याऱ्या एकुण 11 गुन्हेगारांवर MPDA कायद्या अंतर्गत कार्यवाहया करण्यात आल्या.
- अवैध जुगार धंदयांवर प्रतिबंध करण्यासाठी जुगार कायदयाअंतर्गत 860 केसेस करण्यात आल्या असुन एकुण 58,22,631 रु चा एवढा मोठया प्रमाणात मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.
- अवैध धंदयांविरुदध सुरु केलेल्या अभियान अंतर्गत सन 2024 मध्ये अवैध गुटखा कायद्याअंतर्गत 66 केसेस केल्या असुन एकुण 46,83,669 रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. कोटपा कायदयाअंतर्गत 1079 केसेस करुन एकुण 2,15,800 रुपयांचा दंड वसुल करुन प्रभावी प्रतिबंध करण्यात आले.

## ❖ न्यायालयीन खटले

- 2024 या वर्षात सत्र न्यायालयात खटला चालणाऱ्या एकुण 17 गुन्हयांमध्ये तसेच प्रथम वर्ग न्यायालयात खटला चालणाऱ्या एकुण 1898 गुन्हयांमध्ये एकुण 1915 गुन्हयांमध्ये आरोपीस शिक्षा झाली आहे. तसेच लोकअदालत च्या माध्यमातुन एकुण 2791 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. शिक्षेचे प्रमाण तुलनात्मकदृष्टया जास्त आहे.

## ❖ कायदा व सुव्यवस्था

- समाजात शांतता व सुव्यवस्था राहावी, सर्वसामान्य जनतेची सुरक्षा अबाधीत रहावी, याकरीता वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे दक्ष राहुन सातत्याने प्रभावी कायदेशीर कारवाया, प्रतिबंधक उपाययोजना केल्या. महत्वाचे सन/उत्सव, सार्वजनिक निवडणुका, मोठया कायदा व सुव्यवस्थेच्या वेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी मा.पोलीस अधीक्षक, मा.अपर पोलीस अधिक्षक, तिनही पोलीस उप विभागाचे पोलीस उप अधिक्षक, तसेच जिल्हयातील सर्व पोलीस निरीक्षक यांनी पोलीस विभागाद्वारे आयोजीत मोहीमांचे प्रभावी अंमलबजावणी करीता प्रत्यक्ष सहभागी होवुन **ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन** कायद्याचे उल्लंघन करणा—यांविरुध्द कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला. निगराणी बदमाश, रेकॉर्डवरील गुन्हेगार, वारंटचे आरोपी तसेच नाकाबंदी करुन संशयीत वाहनांची सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करण्यात आल्या. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करुन समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्तापीत राहील याची दक्षता घेण्यात आली.
- वाशिम जिल्हा पोलीस घटकात पोलीस मनुष्यबळ कमी असुनही उपलब्ध पोलीस मनुष्यबळाचे योग्य नियोजन व सातत्याने प्रभावी कायदेशीर कारवाया आणि दर्जात्मक प्रतिबंधक उपाययोजननांमुळे 2024 मध्ये पार पाडलेल्या लोकसभा / विधानसभा निवडणुका निर्भीड व निपक्षपाती वातावरणात कोणताही अनुचीत प्रकार न घडता शांततेत पार पडल्या.
- सन 2024 मधील शिवजयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्री गणेश उत्सव, दुर्गादेवी उत्सव, रमजान ईद असे अनेक महत्वाचे सन उत्सव कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडले.
- वाशिम जिल्हा पोलीस घटकाच्या योग्य नियोजन आणि सतर्कतेमुळे जिल्हयाबाहेरील/राज्याबाहेररील निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या घटनांच्या प्रतिक्रीया उमटुन किंवा प्रतिकूल परिस्थीती निर्माण होवुन जिल्हयामध्ये कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवला नाही.
- दिनांक 05.10.2024 रोजी मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी, भारत सरकार यांचा श्री क्षेत्र पोहरादेवी नियोजीत दौरा कार्यक्रम वाशिम जिल्हा पोलीस घटकाकडे अपुरे मनुष्यबळ, साधनसामग्री तसेच दुर्गम/ग्रामीण भागातील दौरा बंदोबस्त असतांना वाशिम जिल्हा पोलीस दलाकडुन अथक प्रयत्न व काटेकोर नियोजनामुळे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, भारत सरकार यांचा श्री क्षेत्र पोहरादेवी दौरा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला याबाबत वरिष्ठ स्तरावरुन देखील प्रशंसा करण्यात आली आहे.

## ❖ जनसेवेचे उपक्रम

- पोलीस विभागाचे जनसेवेचे उपक्रम -- नागरीकांच्या मदतीसाठी डायल 112, महिलांकरीता महिला तक्रार निवारण कक्ष, दामिणी पथक, अनैतिक मानवी वाहतुक शाखा, सायबर पोलीस स्टेशन, वाहतुक व्यवस्थापन करीता वाशिम शहरात शहर वाहतुक शाखा व संपूर्ण जिल्हयाकरीता जिल्हा वाहतुक शाखा कार्यरत आहे. तसेच चारित्र पडताळणी, शस्त्र परवाना, सशुक्ल, निशुल्क संरक्षण इत्यादी सुविधा आहेत.
- सन 2024 CEIR पोर्टलद्वारे प्राप्त मोबाईल मिसींग तक्रार अंतर्गत मिसींग मोबाईलचा शोध घेउन एकुण 263 मोबाईल तक्रारदार यांना परत करण्यात आले आहेत.
- डायल 112 वर कॉल करणाऱ्या तक्रारदारांना वाशिम पोलीसांचा प्रतिसाद देण्याचा वेळ फक्त 07.32 मिनिटाचा आहे. एवढया कमी वेळात तक्रारदारांपर्यंत पोहचुन त्यांच्या तक्रारीनुसार कार्यवाही केली आहे.
- चालु वर्षात पळवुन नेलेल्या 69 बालकांचा ( मुले आणि मुली ) शोध घेउन त्यांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे.

## ❖ कल्याणकारी उपक्रम

- दिनांक 02.01.2024 ते 08.01.2024 दरम्यान रेझींग डे साजरा करुन जिल्हयातील विदयार्थ्यांना पोलीस प्रशासनाबाबत माहिती देउन सामाजिक जागरुकता वाढविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हयातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये पोलीस अधिकारी यांनी सायबर गुन्हे, शरिराविरुदध होणारे गुन्हे, महिलाविषयक गुन्हे इत्यादीबाबत विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.
- पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार यांचे शारीरीक आणि मानसिक स्वास्थ ठिक रहावे या करीता मा. पोलीस अधिक्षक, वाशिम यांनी वाशिम जिल्हयातील विविध विषयातील तज्ञ डॉक्टरांचे मदतीने हेल्थ कॅम्प आयोजित केला. सदर हेल्थ कॅम्प मध्ये जिल्हयातील 700 पोलीस अधिकारी आणि अंमलदारांची सहपरिवार मोफत वैदयकीय तपासणी करुन आवश्यतेनुसार त्यांचा औषधोपचार करण्यात आला. अशाप्रकारचे हेल्थ कँपचे वेळोवेळी आवश्यक्तेनुसार नियोजन केले जात आहे. ज्यामुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे आरोग्य सांभाळण्यास मदत होत आहे.
- पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना अत्यंत उपयुक्त असलेले **M Police** सेवा प्रणाली जिल्हयात सुरु करण्यात आली आहे. संपुर्ण जिल्हयातील पोलीसांना त्यांचे सेवेतील वैयक्तीक माहिती सेवापट तपशील, त्यांना मिळालेले रिवार्ड इत्यादी त्यांचे मोबाईलद्वारे पाहता येणे सोयीचे झाले आहे.

## ❖ पोलीस भरती

- जुन-जुलै 2024 मध्ये वाशिम जिल्हा पोलीस दलातील घेण्यात आलेल्या पोलीस भरती मध्ये एकुण 68 उमेदवारांची अंत्यत पारदर्शक व प्रामाणीक पध्दतीने निवड करण्यात आली. भरती प्रक्रीयेतील प्रत्येक बाब उमेदवारांचे समक्ष त्यांना समजेल अशा पध्दतीने माहिती देवुन अत्यंत पारदर्शक पोलीस भरती प्रक्रीया राबविण्यात आली.

## ❖ वाशिम पोलीस दलातील खेळाडु

- दिनांक 15.12.2024 ते 20.12.2024 या कालावधीत अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा अमरावती ग्रामीण येथे पार पडल्या या मध्ये वाशिम पोलीस दलातील एकुण 118 पोलीस खेळाडुंनी सहभाग नोंदविला सांघीक व वैयक्तीक असे एकुण 45 मेडल/बक्षीसे प्राप्त करुन वाशिम जिल्हा पोलीस दलास वरीष्ठ पातळीवर नावलौकीक मिळवुन दिले आहे.

## ❖ राष्ट्रपती - शौर्य पदक / पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह

- 2024 मध्ये मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांना गडचिरोली जिल्हयामध्ये नक्षलग्रस्त भागात प्रशंसनिय सेवेबद्दल **राष्ट्रपती - शौर्य पदक** मिळालेले आहे. तर वाशिम जिल्हा पोलीस दलातील **04** पोलीस अंमलदारांना त्यांचे **प्रशसंनिय सेवेबद्दल** पोलीस महासंचालक **सन्मानचिन्ह** प्रदान करण्यात आलेले आहे.

## ❖ नुतनीकरण

- वाशिम जिल्हा पोलीस दलाचे मुख्य कार्यालयाची ईमारत सन 2004 मध्ये पुर्ण होवुन मिळाल्याने सन 2024 पर्यंत इमारतीमधील सर्वच विभागाचे दालने सोयीचे राहीले नव्हते अशा अवस्थेत मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांचे प्रयत्नांमधुन पोलीस अधीक्षक कार्यालयाचे नुतनीकरण करण्यात आले. सर्व विभागाचे दालनांना सुसज्ज कार्पोरेट लुक देण्यात आला आहे. शेडचे नुतनीकरण करुन बहुउपयोगी **कर्तव्य सदन** हॉलची निर्मीती करण्यात आली, **कर्तव्य सदन** हॉलचा वेगवेगळया कार्यक्रमाकरीता उपयोग होत असुन अंत्यत सोयीचे झाले आहे. पोलीस सब्सीडरी कँटीनचे नुतनीकरण, पोलीस मुख्यालय येथील मैदान अंत्यत खडबडीत, खालीवर असे होते. त्यामुळे अनेक अडचणी येत असल्याने मैदानाचे सपाटीकरण सर्व सोयीसुविधायुक्त तयार करुन घेण्यात आले. इत्यादी अनेक कामे चालु वर्षात पार पाडण्यात आली आहेत.

वाशिम जिल्हा पोलीस दल सदैव जनतेच्या रक्षणार्थ सुसज्ज आहे. वाशिम जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेद्वारे जनतेस आवाहन करण्यात येत आहे की कोणतेही गुन्हेगारी कृत्य किंवा अनुचित प्रकार आपल्या निदर्शनास आल्यास आपण तात्काळ जवळचे पोलीस स्टेशन किंवा डायल 112/100 या हेल्पलाईनवर संपर्क करावा.

**पोलीस निरीक्षक**
**स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम.**